# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सावली (जि.चंद्रपूर) येथे आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र मुलामुलींचे वसतीगृह बांधण्याबाबत

**(१) ३०१२ (२२-१२-२०१४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत सावली तालुक्याची निर्मिती होवून २२ वर्ष झाले असूनही आदिवासी विभागाच्या वतीने आदिवासी विद्यार्थीनी आणि विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह नसल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याची माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली येथे आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र मुलामुलींचे वसतिगृह मंजूर करुन बांधकाम करावे अशी मागणी लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी वेळोवेळी केली आहे हे, खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागाच्या वतीने स्वतंत्र मुलामुलींचे वसतीगृह मंजूर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१), (२) व (३) वसतींगृहासाठी शहरामध्ये जागा मिळविणे, बांधकाम करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, तसेच भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्याऐवजी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे. सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथे आदिवासी वसतिगृहांची संख्या वाढविण्याबाबत

**(२) १५७५१ (१२-०४-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे आदिवासी विकास विभागाची एकूण १८ वसतिगृहे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये एकुण १ हजार ८५ मुले व ५५० मुली राहतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व वसतिगृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त मुले व मुली राहत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वसतिगृहांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये कार्यरत १८ वसतीगृहांमध्ये ११३६ मुली व १६१३ मुले प्रवेशित आहेत.

(३) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये कार्यरत मुलांच्या ९ वसतीगृहांची क्षमता १७२० आणि मुलींच्या ९ वसतीगृहांची क्षमता १२१० आहे.

(४) व (५) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ इतकी आहे. मागील तीन शैक्षणिक वर्षात वसतीगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांची साधारणत: २०,००० विद्यार्थी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, वाढीव क्षमतेकरीता वसतीगृह बांधकामास जागा मिळविणे, वसतीगृह बांधकाम करणे किंवा इमारत भाड्याने उपलब्ध करणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती इ.करीता लागणारा विलंब व भांडवली खर्च टाळून शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) परिसरातील वसतिगृहांची प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत**

**(३) ५०१७८ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) परिसरात आदिवासींची संख्या मोठी असून वसतिगृहाची प्रवेश क्षमता कमी असल्याने येथील वसतिगृहांची प्रवेश क्षमता दुपटीने वाढविण्याचे आश्वासन दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) वसतिगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतिगृहांची साधारणत: २०,००० विद्यार्थी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, अधिक क्षमतेच्या वसतिंगृहासाठी शहरामध्ये भाड्याची जागा मिळविणे, भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतिगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी, क्षमता वाढ करण्याऐवजी शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून मंत्रीमंडळाच्या मान्यतेने पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (ता.पारशिवनी, जि.नागपूर) व देवलापार (ता.रामटेक) येथे शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृह सुरु करण्याच्या मागणीबाबत**

**(४) ७१५५८ (११-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी (ता.पारशिवनी) देवलापार (ता.रामटेक) येथे शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृह सुरु करण्याच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृह सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) व (२) वसतींगृहासाठी शहरामध्ये जागा मिळविणे, बांधकाम करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, तसेच भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्याऐवजी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.
सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील धामणगाव रेल्वे तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी मुलांचे १०० व मुलींचे १०० क्षमतेचे वसतीगृह सुरु करण्याबाबत**

**(५) ७९६१४ (२८-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील धामणगाव रेल्वे तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी मुलांचे १०० व मुलींचे १०० क्षमतेचे वसतीगृह सुरु करणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :**(१) धामणगाव रेल्वे येथे आदिवासी मुला व मुलींकरीता शासकीय वसतीगृह सुरू करणेबाबतचा प्रस्ताव दि. १.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त कार्यालयाने शासनास सादर केलेला आहे.
(२) व (३) जेथे वसतिगृहे नाहीत किंवा शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना सूरू करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २०१८-१९ पासून तालुकास्तरावर राबविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

**नाशिकसह राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विदयार्थ्यांना पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वंययोजनेतंर्गत रोख रक्कमेचा लाभ देण्याबाबत**

**(६) ८००५९ (२८-११-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकसह राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विदयार्थ्यांना पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वंययोजनेतंर्गत रोख रक्कमेचा लाभ देण्याची मा.मुख्यमंत्री यांनी घोषणा केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या घोषणेची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात विभागीय व जिल्हास्तरावरील प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या ११६ वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या १,५३७ विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तर सन २०१७-१८ मध्ये आजअखेर २,२३३ विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांकरिता नवीन नियमावली प्रसिध्द करण्यात आल्याबाबत**

**(७) ८०८२५ (२८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळेतील विदयार्थ्यांचे सांयकाळचे जेवण व सकाळचा अल्पोपहार यांच्या वेळेतील अंतर कमी करण्यासाठी डॉ.सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानंतर आदिवासी विकास विभागाने राज्यातील शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांकरिता नवीन नियमावली प्रसिध्द करण्यात आल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमावलीमुळे राज्यातील सर्व आश्रमशाळांतील शालेय कामकाजाची वेळ व विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या अल्पोपहार व भोजनाची वेळ बदलली असून सायंकाळचे जेवण व दुस-या दिवशीचे जेवण यात तब्बल १६ तासांचे अंतर पडत असून पुर्वीच्या वेळेपेक्षा ते २ तासांनी वाढले आहे यामुळे आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०६-२०१८) :** (१) डॉ.सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरून शासनाच्या दि.२२/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे सायंकाळचे जेवण व सकाळचा अल्पोहार यामधील अंतर कमी करणेसाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेच्या शालेय कामकाज, भोजन आणि अल्पोपहाराच्या वेळेत बदल करण्यात आला असून त्यानूसार अंमलबजावणी सुरू आहे.
(२) व (३) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सांयकाळी जेवण व सकाळच्या अल्पोपहार यातील अंतर कमी करण्यासाठी शासकीय/अनुदानित आश्रमशाळेच्या जेवणातील अंतर वाढलेले नसून कमी झाले आहे.

---

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सर्पदंशाचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(८) ८०८२६ (२८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सर्पदंश होण्याचे प्रमाण वाढले असून सर्पदंशामुळे गत वर्षात अंदाजे पाच टक्के विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्पदंशाला आळा घालण्यासाठी जमिनीपासून उंच व चारही बाजूंनी सुरक्षित असलेला बंकर बेड या विद्यार्थ्यांना देण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाने केला असून याबाबत आवश्यक निधीही आदिवासी विभागाकडे पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळा/वसतीगृहातील विद्यार्थ्यांना बंकर बेड डब्बल डेकर पुरवठा करण्यासाठीची खरेदी प्रक्रिया दि.१५/६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार अपर आयुक्त स्तरावरून करण्याबाबत धोरण निश्चित झाले आहे. त्यानूसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात बंकर बेडचे परिमाण आयुक्त स्तरावरून ठरवून देऊन सदरची खरेदी करणेबाबत अपर आयुक्त यांना निर्देश देण्यात आले आहेत.

---

**राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(९) ८२४४७ (१२-०५-२०१७). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर जमातीला अनुसूचीत जमातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्यातील धनगर समुदायाने माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन व उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय राज्यघटना १९५०, कलम ३४२-सी, नं ३६ प्रमाणे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार करण्यात आलेल्या नॅशनल सॅम्पल सर्वेनुसार प्रा.पी.एन.कोकणे यांनी १९८९ ऑरोन, धनगर, धनगड या जमाती एकच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील माहितीनुसार धनगर जमातीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना संशोधन करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुसार टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षण व संशोधनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अहवालामध्ये समावेश करण्याचे काम सुरु आहे. तसेच अभ्यासक, अधिकारी व विशेष तज्ञ यांनी भेटी दिलेल्या विविध पाच राज्यांचा अभ्यास व त्यातुन मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करुन त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. विविध समित्या व आयोग यांचे अहवाल, भारतीय जाती-जमातीचा मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय ऐतिहासिकदृष्टया अभ्यास, न्यायालयीन न्यायनिवाडे आणि धनगर समाजातील नागरिकांनी सादर केलेले दस्तावेज या सर्वांचे चिकीत्सक परिक्षण करुन त्यांचे संकलन करण्यात आले असून या संकलनाला मुख्य अहवालामध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरु आहे.

संकलीत माहितीच्या आधारे मुख्य अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून मुख्य अहवाल लवकरच सादर करण्यात येणार आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झालेला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतरच पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

---

## भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) चिंबीपाडा सरकारी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीकरिता बांधण्यात आलेल्या वसतिगृहाची दोन वर्षातच झालेली दुरवस्था

**(१०) ८२६३२ (२८-११-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर आदिवासी प्रकल्पांतर्गत भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील चिंबीपाडा सरकारी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीकरिता बांधण्यात आलेल्या वसतिगृहाची दोन वर्षातच दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०६-२०१८) :** (१) व (२) शहापूर आदिवासी प्रकल्पांतर्गत भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील चिंबीपाडा सरकारी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीकरिता बांधण्यात आलेल्या वसतिगृहाची किरकोळ नादुरुस्ती झाली असून, सदर इमारतीच्या दुरुस्तीच्या रु.१८,१२,५७१/- रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शासकीय आदिवासी मुलांचे वसतिगृह कळवण (मानूर) व आदिवासी मुलींचे वसतिगृह कळवण (नाकोडा) येथील गैरकारभाराबाबत

**(११) *८३८८२* (२८-११-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय आदिवासी मुलांचे वसतिगृह कळवण (मानूर) व आदिवासी मुलींचे वसतिगृह कळवण (नाकोडा) येथील रत्नाजी कृष्णाजी खैरनार यांनी श्री. बागुल, आदिवासी निरीक्षक, श्रीमती रोहिणी कर्पे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी व पी.पी. जाधव, कार्यालयीन अधिक्षक यांच्या संगनमताने गेल्या १० वर्षापासून विद्यार्थ्यांना गणवेश, सहल, निर्वाहभत्ता व आहार खर्च अदा न करता बनावट स्वाक्षऱ्या करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) तदनुसार गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :**(१) श्रीमती रत्ना कृष्णाजी खैरनार, कनिष्ठ लिपीक यांनी रू.२,६९,५९३/- एवढी शासकीय रक्कम त्यांच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग करण्याची गंभीर स्वरूपाची अनियमितता केलेली आहे.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयातील लेखाधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांनी सदर गैरव्यवहाराची चौकशी केली. श्रीमती रत्ना कृष्णाजी खैरनार यांना अपर आयुक्त, नाशिक यांनी दि. ९.१२.२०१६ रोजी निलंबीत केले. सहाय्यक आयुक्त (लेखा), अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृह कळवण (मानूर) या वसतिगृहाचे सविस्तर लेखापरिक्षण करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहाचे भाडे गेल्या दीड वर्षापासून दिले नसल्याबाबत**

**(१२) ८४६४६ (२८-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.पालघर) येथील गेल्या दीड वर्षापासून आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहाचे भाडे न दिल्याने वसतिगृह बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वसतीगृहातील ४२ विद्यार्थिनींचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वसतीगृहास साधे तारेचे कंपाऊंड असून भिंतीचे कंपांऊंड हवे अशी मुलींनी मागणी केली असून सदर वसतिगृहात मुलींची जबाबदारी स्वीकारणारा एकही शासकीय कर्मचारी वा अधिकारी नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीतील प्रलंबित असलेले भाडे दिनांक २९.०९.२०१६ रोजी अदा करण्यात आलेले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील आदिवासी मुलांचे वसतिगृह बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१३) ८५१७२ (०९-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक**

**(ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील आदिवासी मुलांचे वसतिगृह बंद करण्याचा निर्णय आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आदिवासी मुलांचे वसतिगृह बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने परिसरातील आदिवासी मुलांची होणारी गैरसोय दुर करुन त्यांच्या वास्तव्यासाठी सोय उपलब्ध करुन देण्यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) आदिवासी विकास विभागांतर्गत उल्हासनगर येथे आदिवासी मुलींकरीता ७५ क्षमतेचे शासकीय वसतीगृह भाड्याच्या इमारतीत कार्यान्वित असून यामध्ये सन २०१६-१७ मध्ये ६० विद्यार्थीनी प्रवेशित होत्या. सदर वसतीगृह इमारतीचे भाडे जास्तीचे असल्याने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून कमी भाडे असलेल्या इतर पर्यायी इमारतीपध्ये स्थलांतरीत करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास यांनी अपर आयुक्त, ठाणे तसेच प्रकल्प अधिकारी, शहापूर यांना कळविले होते, तथापी वसतीगृह बंद करण्याचा निर्णय घेतला नव्हता.

प्रकल्प अधिकारी, शहापूर यांना सर्व सुविधांनी युक्त कमी भाडे असलेली पर्यायी इमारत उपलब्ध न झाल्याने सद्यस्थितीत सदर वसतीगृह पूर्वीच्याच इमारतीत कार्यरत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) शेतकरी भारनियमनामुळे त्रस्त झाल्याबाबत

**(१४) ८७२३१ (२४-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) जंगमहट्टी धरणात पाणी असून भारनियमनामुळे शेतकऱ्यांच्या शेतीस पाणी देता येत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदगड तालुक्यात माहे एप्रिल,२०१७ पासून असलेले भारनियमन रद्द करुन शेतकऱ्यांना धरणातून पाणी देता यावे म्हणून शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) मा.वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शेतीपंपाना दिवसा ८ तास व रात्री ८ तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) माहे एप्रिल, २०१७ मध्ये दि. १३.०४.२०१७ ते १५.०४.२०१७ व दि. २६.०४.२०१७ ते २९.०४.२०१७ पर्यंत अतिउच्च दाब केंद्रातील आयसीटी अधिभारीत झाल्यामुळे, तसेच ५०० एमव्हीए क्षमतेच्या विद्युत रोहित्रातील बिघाडामुळे, करण्यात आलेले अतिरिक्त भारनियमन दि. ३०.०४.२०१७ पासून रद्द करण्यात आले असून सध्या दिवसा ८ तास व रात्री ८ तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कझ्युमर फेडरेशन या दोन प्रमुख शिखर संस्थांनी नियमांविरूध्द खाजगी ठेकेदारांना काम दिल्याबाबत**

**(१५) ८७३५४ (१८-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कझ्युमर फेडरेशन या दोन प्रमुख शिखर संस्थांनी नियमांविरूध्द खाजगी ठेकेदारांना दिलेल्या कामांना स्थगिती देण्याची मागणी मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनाक ०७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी संचालक पणन मंडळ, पुणे यांचेकडून आतापर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कझ्युमर फेडरेशन या दोन प्रमुख शिखर संस्थांच्या कामकाजाबाबत मा.सहकारी मंत्री यांचेकडे बैठकीचे आयोजन करण्याची मागणी दिनांक ३१ जानेवारी,२०१७ रोजी करूनही बैठकीचे आयोजन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य कझ्युमर फेडरेशन या दोन प्रमुख शिखर संस्थांच्या कामकाजास स्थगीती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०६-२०१८) :** (१) होय.

(२) पणन संचालक, पुणे यांच्याशी संबंधित आहे.

(३) नाही. मा. विधानसभा सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार दिनांक १०/८/२०१७ रोजी मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

(४) महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ, मुंबई  या संस्थेने खाजगी ठेकेदारांना दिलेल्या कामांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पणन संचालक, पुणे यांनी दिनांक १६/६/२०१६ रोजी स्थगिती दिली आहे. सदर आदेशाविरुद्ध ग्राहक महासंघाने मा. मंत्री, पणन यांचेकडे केलेल्या अपिलावर दिनांक १३/१/२०१८ च्या आदेशान्वये पणन संचालकांचा निर्णय कायम करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) शेतक-यांना उजनी धरणातील पाणी शेतीपर्यंत पोहचविण्यासाठी वीज जोडणी देण्याबाबत**

**(१६) ८८१४९ (१८-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) उजनी धरण निर्मितीसाठी जमिनी देणा-या करमाळा तालुक्यातील ३५ गावांमधील  शेतक-यांना  धरणातील पाणी शेतीपर्यंत पोहचविण्यास विद्युत मोटारी, केबल, वायर आदींच्या वापरासाठी शेतक-यांनाच विद्युत जोडणीपासून वायरमनची कामे करावी लागतात हे शेतक-यांनी वारंवार लेखी निवेदनांव्दारे उर्जा, जलसंपदा विभागाच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उजनी धरणातील पाणी शेतीपर्यंत पोहचविण्यासाठी वीजपंप व त्यासाठीची वीज जोडणी इत्यादी कामे वीज वितरण कंपनीकडून न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वीज जोडणीकरीता आवश्यक असलेली वायरमनची पदे अद्याप न भरण्याची कारणे काय आहेत वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
सदर लेखी निवेदन  महावितरणच्या क्षेत्रीय व विभागीय कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. वीज मीटरपर्यंत वीज जोडणीची कामे महावितरण कंपनीमार्फत केली जातात व त्यापुढे कृषीपंपापर्यंत वीजजोडणीची कामे ग्राहकांसोबत करार केलेल्या मान्यता प्राप्त विद्युत कंत्राटदारामार्फत केली जातात.
(३) करमाळा तालुक्यामध्ये एकूण ९९ वायरमनची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४५ वायरमन कार्यरत आहेत. रिक्त पदांच्या संख्येच्या ९५% पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानुसार ५४ रिक्त पदांच्या ठिकाणी ४२ वायरमनची पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बळेगाव (ता.उमरी, जि.नांदेड) येथील शेतकऱ्याच्या शेतात**
**विजेच्या तारा लोबंकळत असल्याबाबत**

**(१७) ८९०२० (०९-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळेगाव (ता.उमरी जि.नांदेड) येथील शेतकरी सय्यद हुसेन सय्यद सरवर पटेल यांच्या शेतात विजेच्या तारा लोबंकळत असल्याने त्यांना शेती करता येत नाही व त्यांच्या जनावरांचे ही जीव धोक्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महावितरण कंपनीच्या उमरी कार्यालयात सन २०१४ पासून तक्रारी करुनही या तारा काढल्या गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर शेतक-यांच्या शेतातील विजेच्या लोंबकळणा-या तारा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) श्री.सय्यद हुसेन यांनी माहे मे, २०१७ मध्ये महावितरणचे सहायक अभियंता, (उमरी शहर शाखा कार्यालय, भोकर विभाग) यांना सदरची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर लगेच दिनांक २२ मे,२०१७ रोजी तारांची दुरुस्ती करण्यात आली व चार पोल सरळ करुन लोंबकळणाऱ्या तारा वर घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील वीज देयक भरणा केंद्र बंद करण्यात आले**
**असून नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(१८) ९०४३४ (०९-०८-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पनवेल शहर महावितरण कंपनीतील वीज देयक भरणा केंद्र बंद करण्यात आले असून नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे वीज देयकावरील रिडींग दर्शविणारा फोटो नीट छापून येत नसल्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महावितरण भांडुप नागरी परिमंडळातील वाशी मंडळात पनवेल शहर विभागांतर्गत एकूण ३,६४,१२४ वीज ग्राहक असून ५७ वीज बिल भरणा केंद्रे कार्यरत आहेत. दरम्यान एप्रिल, २०१७ मध्ये या विभागातील खारघर परिसरातील एक ए.टीपी. मशिनचा (वीज बिल भरणा केंद्र) करार संपल्याने ते बंद करण्यात आले आहे. तथापि सदर ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी तेथे चेंबूर नागरी सहकारी पत संस्थेस वीज बिल भरणा केंद्र मंजूर केलेले असून ते सुरळीतपणे चालू आहे.

वीज देयकावरील फोटो नीट छापून येत नसल्याने पनवेल विभागातील खारघर व कळंबोली उपविभागात कार्यरत असलेली मिटर एजन्सी बदलण्यात आली आहे. सदर एजन्सीकडून मोटर रिडींग व्यवस्थित न घेतल्याने २५३६ ग्राहकांसाठी रु. ६३,४००/- एवढा दंड वसूल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी वसतीगृह बंद करून विद्यार्थी कपात करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(१९) ९१५७६ (०९-०८-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी वसतीगृह बंद करून विद्यार्थी कपात करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाविरोधात राजकीय पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहे बंद झाल्यास आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार असून सदरहू निर्णय तात्काळ मागे घेण्याबाबत या संघटनेकडून मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील आदिवासी वसतीगृहे बंद करण्याबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निंबळक-वाजेगाव (ता.फलटण, जि.सातारा) येथे तुटलेल्या विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने दोघांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२०) ९४९४६ (१०-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंबळक-वाजेगाव (ता.फलटण, जि.सातारा) येथे तुटलेल्या विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने दीपक रत्नसिंह मतकर (३५) व पत्नी योगिता दीपक मतकर (३०) या दोघांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या खांबाच्या तारा तुटून खाली पडल्या होत्या व या तारांमध्ये विद्युत प्रवाह सुरु होता आणि विजेचा धक्का लागून दोघांचा मृत्यू झाला असून याबाबत पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृतांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे, तसेच संबधित दोषी कर्मचा-यांची चौकशी करुन त्यांचेवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर घटनेची नोंद फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, जि.सातारा येथे झालेली आहे.

(३) सदर अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना तात्काळ मदत प्रत्येकी रु.२०,०००/-प्रमाणे एकूण रु.४०,०००/-एवढी रक्कम देण्यात आली आहे. तसेच महावितरण कंपनीतर्फे प्रत्येकी रु. ४०,०००/- अशी एकूण रु. ८,००,०००/- एवढी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. तथापि सदर रक्कमेचा धनादेश मृतांच्या नातेवाईकांनी/वारसदारांनी स्विकारण्यास असमर्थता दर्शविली.

तसेच सकृतदर्शनी दोषी आढळून आलेल्या संबंधित विद्युत सहाय्यक यांना महावितरण कंपनीतील सेवा समाप्तीचा आदेश देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ऐरोली क्षेत्रातील महावितरण कार्यालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) ९५०४० (०१-०१-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली क्षेत्रातील महावितरणच्या कार्यालयाची अत्यंत दुरावस्था झालेली असून कार्यालयाच्या छताला लागलेल्या गळतीमुळे भिंती खराब झाल्या आहेत तसेच पाणी गळतीमुळे अधिकारी कर्मचारी यांना त्रास होत असून शौचालायाचीही दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यालयाची दुरुस्ती करण्याबाबत महावितरण प्रशासनाकडे नागरिकांनी पत्रव्यवहार केला असूनही महावितरणने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कार्यालयाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) ऐरोली क्षेत्रात महावितरणचे शाखा कार्यालय सेक्टर-१ व सेक्टर-५ येथील शाखा कार्यालयाच्या छताला वॉटर प्रूफींगचे काम करण्यात आलेले आहे. तसेच शाखा कार्यालयाच्या नूतनीकरणाच्या कामाकरिता निविदेद्वारे दिनांक २८.०३.२०१८ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले व संपूर्ण नूतनीकरणाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत..

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमधील कंत्राटी कामगारांना वेतन मिळाले नसल्याबाबत

**(२२) ९७७३२ (२९-१२-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमधील कंत्राटी कामगारांनी दिलेल्या निवेदनातील कोणकोणत्या मागण्या शासनाने आतापर्यंत मान्य केल्या आहेत,

(२) तसेच सदर तिन्ही कंपन्याकडे कार्यरत असलेल्या कंत्राटदारांपैकी कोणकोणत्या कंत्राटदारांनी किती कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केलेले नाही त्याची कारणे काय आहेत तसेच एकूण किती महिन्याचे वेतन अदा करण्यात आलेले नाही,

(३) असल्यास, कामगारांचे वेतन अदा न करणाऱ्या कोणकोणत्या कंत्राटदारांचा ठेका रद्द करण्यात आला आहे व केव्हा तसेच त्यांना काळया यादीत टाकण्यात आले आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१८) :** (१) कंत्राटी कामगारांच्या मागण्यांच्या अनुषंगाने श्री.रानडे, तत्कालीन कार्यकारी संचालक (मा.सं), महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच, समान काम समान वेतन या कंत्राटी कामगारांच्या मागणीच्या अनुषंगाने संचालक (वित्त) म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्या, यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे कामकाज सुरु असून सदर समितीचा अहवाल शासनास अदयाप सादर झालेला नाही. निवेदनातील इतर मागण्या कंपन्यांच्या स्तरावर विचाराधीन आहेत.

(२) महानिर्मिती कंपनीतील सर्व कंत्राटदारांच्या अधिनस्त काम करण्याऱ्या सर्व कंत्राटी कामगारांचे वेतन कायदयानुसार वेळेवर जमा केले जाते. त्यामुळे कंत्राटदारांकडे कार्यरत कंत्राटी कामगारांचे कुठल्याही महिन्याचे वेतन थकित रहात नाही. महापारेषण कंपनीतील कार्यरत बाहयस्त्रोत कामगारांचे माहे डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे. तसेच, महावितरण अंतर्गत क्षेत्रीय कार्यालयांनी माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर,२०१७ पर्यंतचे कंत्राटी कामगारांचे वेतन अदा केलेले आहे. कंत्राटदाराने माहे ऑक्टोबर,२०१७ पासून कंत्राटी कामगारांचे वेतन अदा केलेले नसल्यामुळे महावितरणच्या मालेगांव मंडळ कार्यालयाने सदर एजन्सीचे काम बंद केले आहे.

(३) महावितरणच्या बारामती परिमंडळातील मे. अजित लेबर्स ॲण्ड सिक्युरिटि सर्विसेस या कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यात आले आहे. तसेच, महावितरणच्या ठाणे मंडळ व अहमदनगर मंडळ या कार्यालयांनी कंत्राटदारांस काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

---

### महावितरणच्या भांडुप झोन अंतर्गत दिवा, मुंब्रा, कळवा या विभागात दिवसा ८ ते १० तास भारनियम करण्यात येत असल्याबाबत

**(२३) ९७९४३ (२९-१२-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या भांडुप झोन अंतर्गत दिवा, मुंब्रा, कळवा या विभागात दिवसा ८ ते १० तास भारनियम करण्यात येत असल्यामुळे नागरिकांनी महावितरणाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा, शीळ, देसाई या विभागात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तसेच भारनियमन कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

वीज निर्मिती केंद्राना कोळशाच्या उपलब्धतेत व पुरवठयामध्ये येत असलेल्या अडचणीमुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दिनांक ३,४,५,६ व ७ रोजी, मा. वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या निकषानुसार महावितरणमार्फत तात्पुरते भारनियमन करण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

देसाई विभाग येथील भारनियमाव्यतिरिक्त वीजपुरवठा सुरळीत आहे. परंतु काही वेळा भारनियमनामुळे बंद असलेली वीजवाहिनी पूर्ववत चालू केल्यानंतर, वीज वाहिनी अतिभारीत होऊन दिवा व शीळ येथील वीज पुरवठा खंडित झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

(३) वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिभारीत वीजवाहिन्यांवरील भार कमी करण्यासाठी हया विभागात केंद्र पुरस्कृत विविध योजनांतर्गत अतिरिक्त वीजवाहिन्या टाकून कार्यान्वित करण्यात आल्या आहेत व काही कामे प्रगतीपथावर आहेत.

महावितरणकडून, वीज उपलब्धता वाढविण्यासाठी वीजनिर्मिती कंपन्यांना सूचना देणे, संचाचे दुरुस्ती व देखभालीचे वेळापत्रक बदलणे, केंद्रीय वाटा व पॉवर एक्सेंजमधून अतिरिक्त वीज विकत घेणे, लघुकालीन निविदा प्रकाशित करुन त्याद्वारे वीज खरेदी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील जव्हार प्रकल्पातील आश्रमशाळांमध्ये एका वर्षात सात विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२४) ९८६७९ (२९-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार प्रकल्पातील आश्रमशाळांमध्ये एका वर्षात सात विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०६-२०१८) :** (१) त्यातील ९ विद्यार्थ्यांचा मृत्यू हा पालकांच्या ताब्यात असताना झालेला आहे व १ विद्यार्थ्यांचा मृत्यू हा आश्रमशाळेच्या आवाराबाहेर गळफास घेतल्याने झाला आहे.

(२) सदर विद्यार्थी मृत्यू चौकशी करण्यासाठी डॉ.सुभाष सांळूखे समितीच्या शिफारशीनुसार व आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.२८.१२.२०१६ नुसार खालीलप्रमाणे समित्या स्थापन करण्यांत आलेल्या आहेत :-

(अ) आपत्कालिन आढावा गट

(ब) वैद्यकीय सामाजिक आढावा गट

(क) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्रैमासिक आढावा गट.

त्यानुसार, विद्यार्थी मृत्यूची चौकशी विविध समित्यामार्फत करण्यांत आली आहे व त्यावर उपाययोजना केली जाते. सदर प्रकरणी प्रशासनातील कोणीही दोषी आढळलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे निर्यात सुविधा केंद्र सुरू करण्याबाबत**

**(२५) ९८८७७ (०६-०१-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी परिसरात वस्त्रोद्योग आणि इतर पूरक उद्योगांचे जाळे असून याठिकाणी मोठया प्रमाणात निर्यातक्षम उत्पादन होत असल्याने याठिकाणी अधिकृत शासनमान्य निर्यात सुविधा केंद्र (Export Facilitation Center) सुरू करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) The Director General of Foreign Trade, New Delhi यांना इचलकरंजी येथे D.G.F.T. चे कार्यालय सुरु करण्याच्या अनुषंगाने दि.१९.४.२०१७ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या एकाही वसतीगृहात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(२६) ९९८८० (२९-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या १८ वसतीगृहांमध्ये सुमारे ३ हजार मुले आणि मुली वास्तव्याला असूनही एकाही वसतीगृहात सीसीटीव्ही कॅमे-याची व्यवस्था नसल्याने या मुला-मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथे गंभीर घटना घडण्याची शक्यता असल्याने शासनाने निधीची तरतूद करुन येथील सर्व वसतीगृहात सीसीटीव्ही बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) अमरावती जिल्हयातील १८ वसतिगृहात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था नाही हे खरे आहे.
(२) सदर वसतीगृहांच्या सुरक्षेसाठी कंत्राटी पध्दतीने चौकीदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच सीसीटीव्ही घेण्याबाबतची कार्यवाही अपर आयुक्त, अमरावती यांच्या स्तरावरुन सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शेलगांव जाहागीर (ता.चिखली, जि.बुलडाणा) गावामध्ये विदयुत पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे विद्युत पोल व तारा जीर्ण झाल्याबाबत**

**(२७) १०२०७६ (०१-०१-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शेलगांव जाहागीर (ता.चिखली, जि.बुलडाणा) गावामध्ये विदयुत पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे विदयुत पोल, तारा जीर्ण झालेल्या असून त्यामुळे अपघाताची शक्यता असल्याने तात्काळ दुरूस्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधिक्षक अभियंता, महावितरण, बुलढाणा यांना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०६-२०१८) :** (१) सहाय्यक अभियंता, चिखली कक्षास दिनांक २२.०९.२०१७ रोजी ग्रामपंचायत शेलगांव जहाँगीर येथील समस्त गावकरी यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) मौजे शेलगांव जाहागीर मध्ये अस्तित्वात असलेली विद्युत वाहिनी जीर्ण नसून तांत्रिकदृष्ट्या सक्षम व सुस्थितीत आहे. मात्र सदर गावात लघुदाब वाहिनीचे गाळा (स्पॅन) चे तार (conductor) लूज असल्यामुळे शॉट सर्कीट होत असल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने सदर गावातील लघुदाब वाहिनीचे ४ गाळा (स्पॅन) च्या सैल तारा दिनांक २९.९.२०१७ रोजी व्यवस्थित ओढण्यात आल्या व आवश्यक तिथे स्पेसर्स सुध्दा बसविण्यात आलेले आहेत.

गावातील ३ सिंगल फेज २५ के.व्ही.ए रोहित्रांचे मेंटेनन्सचे काम दिनांक २९.०९.२०१७ रोजी करण्यात आलेले असून नवीन केबल आणि किटकॅट बसविण्यात आलेले आहेत.

३३/११ के.व्ही. उपकेंद्र एकलारा येथून एकलारा ते शेलगांव गावासाठी ११ के.व्ही. स्वतंत्र गावठाण विद्युत वाहिनी, ३ फेज ५ वायर लघुदाब विद्युत वाहिनी व १०० के.व्ही.ए. चे गावठाण रोहित्र इत्यादी कामे पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत समाविष्ट आहेत. कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरपूर (जि.वाशिम) येथील विद्यार्थ्याला कार्यालयाकडून वेळेवर जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्याने झालेले शैक्षणिक नुकसान**

**(२८) १०२१७८ (०६-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरपूर (जि.वाशिम) येथील जात वैधता पडताळणी कार्यालयाकडून वेळेवर प्रमाणपत्र न मिळाल्याने दिलीप विश्वंभर यांच्या पाल्यास महाविदयालयामध्ये प्रवेशापासून वंचित रहावे लागले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर सादर केले असतांना देखील केवळ स्वाक्षरी करण्याला अधिकाऱ्यांनी विलंब लावल्यामुळे या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) श्री.आदित्य दिलीप विश्वंभर, विद्यार्थी, शिरपूर यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रास्तव वाशीम समितीकडे दि.०५/१२/२०१६ रोजी सादर केला होता. सदर प्रास्तव अपुऱ्या कागदपत्रांमुळे त्रुटीमध्ये आल्यामुळे अर्जदारास त्रुटी पूर्ण करण्यासाठी कळविण्यात आले. त्रुटीची पूर्तता करून घेऊन समितीने जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.२२/०५/२०१७ रोजी वैध करून सदर जात वैधता प्रमाणपत्र घेऊन जाणेबाबत संबंधिताला संदेश देण्यात आला. प्रस्ताव धारकाचे वडील श्री.दिलीप विश्वंभर यांनी दि.२७/०७/२०१७ रोजी सदर जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी (जि.नाशिक) क्रिडा प्रबोधिनी कांबळगांव (जि.पालघर) येथे सुरु करण्यात येत असल्याबाबत**

**(२९) १०६६५२ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) येथे दळणवळणाची साधने व तज्ञ प्रशिक्षकांची उपलब्धता नसल्याचे कारण देवून इगतपुरी क्रिडा प्रबोधिनी कांबळगांव (जि.पालघर) येथे सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये विरोध केला असून इगतपुरी क्रिडा प्रबोधिनीच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करून हे काम सुरु करण्याची मागणी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दिनांक २९ मे, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेल्या सदर प्रबोधिनीचे इगतपुरी येथे बांधकाम सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद केली नसल्याने सदर क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात आलेली नाही.

सद्यस्थितीत आदिवासी विभागाच्या चार अपर आयुक्त कार्यालयांतर्गत एक याप्रमाणे चार क्रीडा प्रबोधिनी सूरू करण्याचा विभागाचा मानस आहे. त्यानुषंगाने कांबळगाव, जि.पालघर येथील क्रीडा प्रबोधिनीबाबत कार्यवाही प्रगतीपाथवर आहे. याव्यतिरिक्त इगतपुरी, जि.नाशिक येथे क्रीडा प्रबोधिनीचे बांधकाम सूरू करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रक तयार करुन त्यावरील खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणलेनंतर निविदा प्रक्रीया सूरू करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील महादेव कोळी समाजाच्या नागरिकांचा आदिवासी प्रवर्गात समावेश करण्याबाबत**

**(३०) १०७१५८ (२८-११-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महादेव कोळी समाजाच्या नागरिकांचा आदिवासी प्रवर्गात समावेश करण्याची बाब सन १९८५ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजाच्या नागरिकांचा आदिवासी प्रवर्गामध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) व (२) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खालील महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रासंबंधात दि.०६ सप्टेंबर,१९५० रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सुचिबध्द केलेल्या आहेत. त्यामध्ये कोळी महादेव जमातीची नोंद आहे. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीतील कोळी महादेव जमातीस अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अघई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय कन्याशाळेस आश्रमशाळेचा दर्जा मिळणेबाबत**

**(३१) १०७२९४ (०४-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अघई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय कन्याशाळेस आश्रमशाळेचा दर्जा देण्याची मागणी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०६-२०१८) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, अघई, ता.शहापूर, जि.ठाणे या शाळेकरीता जमीन प्राप्त असून ती विभागाच्या नावे आहे. सदर शाळेकरीता नवीन मुलां/मुलींचे वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. शालेय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. शासकीय आश्रमशाळा, अघई, ता.शहापूर, जि.ठाणे येथे वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यालय, शिक्षकदालन, क्रिडांगण, संगणक कक्ष, मुबलक पाणी, विद्युत व्यवस्था, पुरेसे शौचालय व स्नानगृह, सिकरुम, कर्मचारी, निवास व्यवस्था इत्यादी सोयीसुविधा उपलब्ध आहेत. शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, अघई, ता.शहापूर, जि.ठाणे परिसरात जिल्हा परिषदेच्या इ.७ वी पर्यंतच्या शाळा असल्याने, तसेच हा परिसर आदिवासी उपयोजना क्षेत्र (TSP) असल्याने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थीनींची संख्या खूप मोठया प्रमाणावर असल्याने सदर शासकीय आश्रमशाळा अघई, ता.शहापूर, जि.ठाणे या आश्रमशाळेचे शासकीय कन्या आश्रमशाळेत रुपांतर होण्याबाबत आयुक्तस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महावितरण अभियंत्यांनी राज्यव्यापी आंदोलन केले असल्याबाबत**

**(३२) १०८३६४ (०४-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण अभियंत्यांनी माहे डिसेंबर, २०१७ च्या तिस-या आठवड्यात वा त्या सुमारास राज्यव्यापी आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन (एसईए) या संघटनेतर्फे वेळोवेळी प्रशासनाला पत्रव्यवहार करुनही प्रशासनाने दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संघटनेने केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनच्या मागण्यांबाबत महावितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि संचालक (संचलन) यांच्या स्तरावर संघटना प्रतिनिधींसोबत वेळोवेळी चर्चा करण्यात आली आहे.
(३) व (४) सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत दि. १२.०१.२०१८ रोजी संघटनेच्या मागण्यांबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी यांच्या स्तरावर सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेत काही प्रश्न निकाली काढण्यात आले व बैठकीत झालेल्या निर्णयांनुसार काही प्रलंबित प्रश्नांवर कार्यवाही सुरु आहे. सदर बैठकीत संघटनेच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय होऊन काही प्रश्न निकाली निघाल्याने सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनने त्यांचे पुढील प्रस्तावित आंदोलन स्थगित केले.

---

**शसनाच्या जात पडताळणी विभागात कर्मचारी संख्या अपुरी असल्यामुळे प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) १०९४६७ (०४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या जात पडताळणी विभागात कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्यामुळे राज्यातील आदिवासींच्या ४७ जातींची सुमारे १२ लाखांची जात पडताळणी प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती, शासकीय योजना, शिक्षण, वैधता प्रकरणे, घरकुल योजना आदी शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जात पडताळणी विभागात रिक्त कर्मचारी पदांची भरती करण्याबाबत तसेच जात पडताळणी प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

८ अनुसुचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे मार्च, २०१८ अखेर एकूण २९७ पदे मंजूर असुन त्यापैकी २२५ पदे भरण्यात आलेली आहे. तसेच मार्च, २०१८ अखेर ३०८२४ प्रकरणे समित्याकडे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सरळसेवेने तसेच पदोन्नतीव्दारे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(३४) १०९८१० (१८-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथे आदिवासी कोळी समाजाने विविध मागण्यांसाठी मोर्चे काढल्याबाबत**

**(३५) ११००६६ (१८-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथे आदिवासी कोळी समाजाने विविध मागण्यांसाठी प्रांत अधिकारी कार्य़ालय, मंगळवेढा येथे मोर्चे काढले असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळी समाजाने जातीच्या दाखल्यासाठी पहिल्या टप्यात २० ते २५ प्रकरणे सेतू कार्यालयात सादर केली होती परंतू सदर सर्व प्रकरणे एकाच तारखेला एकसमान, कारणे देवुन प्रांत कार्य़ालयाकडून फेटाळण्यात आली असुन अर्जदाराला प्रत्यक्ष म्हणणे मांडण्याची संधी नाकारल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार कोळी समाजाच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मंगळवेढा तालुक्यातील कोळी समाजाने मोर्चा काढून उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांच्याकडे दि.०१.०१.२०१८ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांच्याकडे कोळी महादेव अनुसूचित जमातीचे दाखले मिळण्यासाठी २० अर्ज सेतु/ महा ई सेवा मार्फत प्राप्त झाले होते. अर्जदार यांच्याकडून आवश्यक ते पुरावे सादर न केल्याने अर्जदार यांचे अनुसूचित जमातीचे दाखला मिळण्याबाबत मागणी अर्ज नाकारण्यात आले. सदर आदेशाविरुध्द अर्जदार यांनी अपिल दाखल केले नाहीत.

निवेदनातील जातीच्या दाखल्याच्या मागणीच्या अनुषंगाने सेतू कार्यालयामध्ये अनुसूचित जमातीच्या दाखल्याबाबत अर्जदार यांच्याकडून आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल केल्यानंतर संबंधितांचे कायदेशीर पुरावे तपासून व प्रकरणांची शहानिशा करून मागणी केलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्यांबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे उपविभागीय अधिकारी कार्यालय मंगळवेढा यांच्याकडून दि.०७.०२.२०१८ रोजी आदिवासी कोळी समाज कृती संघटना, मंगळवेढा यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गत वर्षाच्या हंगामात नाफेडने केलेल्या तूर खरेदीत मोठ्या प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(३६) ११०१४१ (२१-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथे गत वर्षी तूर खरेदी केंद्रावर लाखो क्विंटल तूर खरेदी केली जात असताना त्यामध्ये वजनाच्या बाबतीत गैरव्यवहार केला जात असल्याने त्याचा भूर्दंड शेतकऱ्यांना बसत असल्याचे निदर्शनास आले आहे होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तूर खरेदी केंद्रावरील गैरव्यवहारासंदर्भात शासनाने चौकशी पूर्ण केली आहे काय,

(३) असल्यास, यातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) व (२) नाही.

नाफेडच्या निकषानुसार बारदानाचे वजन ५८० गॅम इतके आहे.खरेदी केंद्रावर एकूण वजन ५० किलो व बारदानाचे वजन ५८० गॅम गृहीत धरुन एका पोत्यामध्ये ५०.५८० किलो एवढे तूरीचे माप करुन घेण्यात आले आहे. यापेक्षा जास्त वजनाने शेतकऱ्यांची तूर घेण्यात आल्याबाबत अथवा गैरव्यवहार झाल्याबाबत जिल्हा पणन अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तक्रार प्राप्त नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्यासाठी अस्तित्वातील उद्योग घटकांना सोयी सवलती देण्याबाबत

**(३७) १११३१५ (२०-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्यासाठी अस्तित्वातील उद्योग घटकांना सोयी सवलती देण्याबरोबरच राज्यात कापूस ते गारमेंट अशी उत्पादन साखळी निर्माण करण्यासाठी श्री.सुरेश हळवणकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने याबाबतचा अहवाल माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवाल सादर करुन तीन वर्षे होऊनही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याची कारणे काय आहेत व उक्त प्रकरणी अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय,
(३), (४) व (५) राज्य शासनाने वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १३ नोव्हेंबर २०१४ च्या शासन निर्णयांन्वये श्री. सुरेश हळवणकर, विधान सभा सदस्य, यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या सुचना तसेच राज्यातील वस्रोद्योगाच्या विकासासाठी विविध गरजा विचारात घेऊन शासनाने सर्वसमावेशक असे महाराष्ट्र राज्याचे नविन वस्रोद्योग धोरण २०१८-२३ दि. १५/०२/२०१८ रोजी जाहीर केले आहे.

---

## मुंबईमधील विक्रोळी पूर्व येथील मे. गोल्ड कॉईन फॅमिली बार ॲण्ड रेस्टॉरन्टला विभागाने दिलेला परवाना रद्द करण्याबाबत

**(३८) १११६१० (१८-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील विक्रोळी पूर्व येथील नागरिकांचा विशेषतः महिलांचा मे. गोल्ड कॉईन फॅमिली बार ॲण्ड रेस्टॉरन्टला मोठया प्रमाणात विरोध असल्याने सदर बार ॲण्ड रेस्टॉरन्टला राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिलेला एफएल-३ परवाना रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याची बाब दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दिलेला परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,

तथापी सदर आस्थापनेस एफएल-३ अनुज्ञप्ती प्रत्यक्ष प्रदान करण्यात आली नव्हती.

(२) राज्य उत्पादन शुल्क विभागाने अनुज्ञप्ती मंजूर केलेली नाही. सहायक आयुक्त, एस वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र.ACS/६९१/MOH दिनांक २३.०१.२०१८ अन्वये सदर आस्थापनेचे अग्निशमक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द केल्याचे कळविले असून, अग्नीशमक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे खाद्यगृह अनुज्ञप्ती रद्द केली आहे. त्यामुळे एफएल-३ अनुज्ञप्ती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गोवारी समाजाला आदिवासी घोषित करून अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३९) १११९३९ (१८-०४-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोवारी समाजाला आदिवासी घोषित करून अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ नोव्हेंबर, १९९४ रोजी नागपूर येथे गोवारी समाजाच्या मोर्चात ११४ गोवारी नागरिकांच्या मागणीसाठी शहीद झाले असतानाही अद्यापपर्यंत या संदर्भात निर्णय न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने या संदर्भात तातडीने निर्णय घ्यावा व गोवारी समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती द्याव्यात अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या संदर्भात अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीतील Gond Gowari या नोंदीऐवजी Gowari अशी दुरूस्ती करून गोवारी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत शासनास विविध स्तरावरून मागण्या प्राप्त झाल्या आहेत त्या अनुषंगाने गोवारी समाजाचा संशोधनात्मक अभ्यासाचे ( संशोधन/ सर्वेक्षण) काम टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस,मुंबई या स्वायत्त संस्थेकडून करण्यास शासनाने दि.०८.१२.२०१७ च्या ज्ञापनान्वये मान्यता दिली आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेकडून संशोधनात्मक अभ्यासाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## रक्ताचे नाते संबंधातील जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे कुटुंबातील व्यक्तिंना जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

**(४०) १११९६४ (१९-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रक्ताचे नाते संबंधातील जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे कुटुंबातील व्यक्तिंना जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतच्या नियम २००३ मध्ये सुधारणा करण्यासाठी शिफारस करण्याकरीता शासनाने मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंत्रिमंडळ उपसमितीने याबाबत शासनास सुधारणा सुचविण्याचा अहवाल एका महिन्यात सादर करावा असे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याची कारणे काय आहेत व रक्तनाते संबंधातील जात वैधता प्रमाणपत्रासाठी ज्या सुधारणा करण्यात येणार आहेत त्यात अनुसुचित जमाती प्रवर्गाचाही समावेश करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करुन एक महिन्याचा कालावधी उलटून गेला असून समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(५) असल्यास, उपसमितीच्या अहवालातील सुधारणांचे स्वरुप काय आहे व याबाबत अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०६-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) (४) व (५) "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या

पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० लागू केलेला आहे. सदर अधिनियमांतर्गत आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमातीसाठी “महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ तयार केलेले आहेत. तसेच सामाजिक न्याय विभागाने उर्वरित मागासवर्गीय प्रवर्गासाठी “ महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) नियम, २०१२ तयार केलेले आहेत.

सामाजिक न्याय विभागाच्या नियम २०१२ मधील नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. सदर सुधारणा हया अनुसूचित जमाती करिता नियम २००३ साठी लागू नाही.

सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर, अनुसूचित जमातीसाठी जातीचे प्रमाणपत्र /वैधता प्रमाणपत्र देणेविषयक नियमांनाही सदर सुधारणा लागू करण्याबाबत अभिप्राय देण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दिनांक १५.११.२०१७ अन्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मंत्रीमंडळ उपसमितीची पहिली बैठक दि. २८.११.२०१७ रोजी संपन्न झाली. तद्नंतर दुसरी बैठक दि.१८.०४.२०१८ रोजी संपन्न झाली आहे.

---

**चोपडा व यावल (जि.जळगाव) तालुक्यासाठी कमी उद्दिष्ट ठरविण्यात आल्याने शबरी आदिवासी घरकुल योजनेपासून अनेक लाभार्थी कुटूंबे वंचित राहणार असल्याबाबत**

**(४१) १११९६५ (१८-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील शबरी आदिवासी घरकुल योजनेचे सन २०१७-१८ मध्ये २०३ व यावल तालुक्यासाठी १४३ उद्दिष्ट होते, परंतू सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात चोपडा तालुक्यासाठी १०५ इतके आणि यावल तालुक्यासाठी केवळ ७४ इतके उद्दिष्ट ठरविण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात आदिवासी कुटूंबे घरकुलापासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षाचे चोपडा व यावल तालुक्यासाठी घरकुलांचे उद्दिष्ट कमी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चोपडा व यावल हे आदिवासी बहुल तालुके असल्याने या तालुक्यांचे उद्दिष्ट वाढविण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली असून त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०५-२०१८) :** (१) शासन पत्र दि. १ जून,२०१७ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल बांधकामासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरीता जळगांव जिल्हयाकरीता ६०३ घरकुलांचे उद्दिष्ट आदिवासी लोकसंख्या विचारात घेवून निश्चित ठरविण्यात आले होते. तथापि, लोकसंख्येच्या निकषाऐवजी सामाजिक, आर्थिक व जनगणना (SECC)-२०११ नुसार शासन पत्र दि.५.८.२०१७ अन्वये जळगांव जिल्हयाकरीता ६५९ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यामध्ये चोपडा तालुक्याकरीता १०५ व यावल तालुक्याकरीता ७४ घरकुलांचे उद्दिष्ट प्रकल्प अधिकारी, यावल यांनी निर्धारित केले. आदिवासी कुटुंबांना शबरी आदिवासी घरकुल योजने व्यतिरिक्त अन्य योजनांतूनही घरकुले दिली जातात. सन २०१७-१८मध्ये जळगांव जिल्हयाकरीता प्रधानमंत्री आवास योजना ग्रामिण अतंर्गत अनुसूचित जमातीचे ३३२१ व पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजनेकरीता १०८ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) व (३) सामाजिक, आर्थिक जात जनगणना २०११ च्या प्राथ्यम यादीतील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामिण अतंर्गत लाभ देण्यात येत असल्याने, सदर प्राथम्य यादीबाहेरील परंतु ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.१.२० पर्यंत आहे, अश्या SECC-२०११ च्या डाटा नुसार उपलब्ध लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी जळगाव जिल्ह्याकरीता सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वर्षाकरीता अनुक्रमे ६५९,६५९,६५९ असे ३ वर्षाकरीता एकूण १९७७ घरकुलांचे सुधारित उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सन २०१९-२० नंतर एकही आदिवासी घरकुलाविना राहणार नाही, असे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोयाबीनच्या अनुदानाची वाढीव रक्कम मिळण्याबाबत**

**(४२) ११२३०१ (२३-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील सोयाबीनच्या वाढीव प्रतिक्विंटल २०० रुपये अनुदानासाठी २६ हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले असून त्यातील २२ हजार २८९ शेतकरी पात्र ठरले तर ४ हजार १५३ शेतकरी अपात्र ठरल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून सोयाबीनच्या अनुदानासाठी बाजार समितीला ६ कोटी ४ लाख ९३ हजार इतकी रक्कम अनुदान पात्र शेतकऱ्यांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाजार समितीला प्राप्त झालेले वाढीव अनुदान शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) व (२) सोयाबीन अनुदानाच्या मागणीसाठी शेतकऱ्यांकडून जालना जिल्ह्यातील पाच कृषि उत्पन्न बाजार समितीकडे २९६१० अर्ज प्राप्त झाले होते. त्या अर्जापैकी २४८७८ शेतकरी पात्र ठरले व ४७३२ शेतकरी अपात्र ठरले.

जालना जिल्ह्यातील पाच कृषि उत्पन्न बाजार समितीमधील २४८७८ शेतकऱ्यांना रुपये ६,७९,३२,४१९/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करुन थकीत रक्कम देण्याबाबत**

**(४३) ११२३५४ (२१-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात शासनाच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर ‘स्टार ॲग्री’ या कंपनीतर्फे ग्रेडर नियुक्त करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील आठ खरेदी केंद्रांवर खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीनचे सुमारे चार कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ४२१ शेतकऱ्यांचे चांगले सोयाबीन विविध कारणे दाखवून स्टार ॲग्री या कंपनीचे ग्रेडर जाणीवपूर्वक रिजेक्ट करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांचे सर्व सोयाबीन खरेदी करण्यासंदर्भात तसेच थकीत रक्कम शेतकऱ्यांना तातडीने देण्यासंदर्भात तसेच स्टार ॲग्री कंपनी यांनी नियुक्त केलेले ग्रेडर व कंपनीला काम देणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

लातूर जिल्ह्यातील १० खरेदी केंद्रावर २२११ शेतकऱ्यांचे ३४४२९ क्विंटल सोयाबीनची खरेदी केली असून त्याबद्दल रुपये १०,५०,०८,४५०/- इतकी रक्कम सबएजंट संस्थामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केली आहे.

(३) व (४) नाफेडने निश्चित केलेल्या निकषानुसार ग्रेडरकडून FAQ मालाची खरेदी केली जाते. FAQ दर्जाचा नसलेला शेतमाल खरेदी करता येत नाही. त्यामुळे ग्रेडरकडून जाणीवपुर्वक शेतमाल नाकारला जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच यासंदर्भात एकही तक्रार जिल्हा पणन अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महानिर्मिती कंपनीच्या परळी, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक, कोराडी, खापरखेडा व पारस येथील औष्णिक वीज केंद्राच्या थकबाकीबाबत**

**(४४) ११२५५७ (०४-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मिती कंपनीच्या परळी, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक, कोराडी, खापरखेडा व पारस येथील औष्णिक वीज केंद्रांची पाणी पट्टी, पुर्नस्थापना खर्च, करारनामा नुतनीकरण आणि दंड अशी सुमारे ५०० कोटींची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकी शासनाने माफ करावी अशी मागणी महानिर्मिती कंपनीने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्यापही यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला नसल्यास त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर रक्कम ही पाणीपट्टी थकबाकीची नसून विविध कारणास्तव आकारलेला दंड व इतर शुल्क जसे सिंचन पुर्नस्थापना खर्चाची केलेली मागणी, करारनामा नुतनीकरण न केल्यामुळे दंड, प्रदूषण मंडळाचे गुणवत्ता प्रमाणपत्र वेळेवर सादर न केल्यामुळे आकारलेला दंड, करारनामा न केल्यामुळे स्वामित्व शुल्कावर आकारलेला दंड, पाण्याचा वापर आरक्षित परिमाणापेक्षा कमी केल्यामुळे आकारलेला दंड, भाग भांडवलीचा खर्च दिल्यानंतरही सवलतींचा दर न लावणे, जास्तीचे पाणी वापर व कालावधी संभ्रम इत्यादि कारणांमुळे आकारलेली आहे. महानिर्मिती कंपनीकडून पाण्याची देयके नियमितपणे भरली जात आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) महानिर्मिती कंपनीच्या परळी, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक, कोराडी, खापरखेडा व पारस येथील पाणीपट्टी पुर्नस्थापना खर्च, करारनामा नूतनीकरण व दंडनीय रक्कम माफ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) बस स्टँड समोरील के.ए.जैस्वाल यांचे दारूचे दुकान बंद करण्याबाबत**

**(४५) ११२९३७ (०७-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) बस स्टँड समोरील के.ए.जैस्वाल यांचे दारूचे दुकान बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान गावकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे. मेहकर येथील के.ए. जैस्वाल यांचे दारूचे दुकान बंद करण्याबाबत श्री.ज्ञानेश्वर प्रल्हाद आव्हाळे व इतर रहिवाश्यांचा दि.७.९.२०१७ व दि.२५.९.२०१७ रोजीचा तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, बुलडाणा कार्यालयास प्राप्त झाला आहे.

(२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चिखली यांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी दि.११.१०.२०१७ व दि.५.१२.२०१७ च्या पत्रान्वये सदर अनुज्ञप्ती विकास आराखडयात १५ मीटर डी.पी. रोड प्रस्तावित केलेल्या रस्त्याने बाधीत होत नसल्याचे कळविले असून नगर परिषदेकडून सन २००४ न.प. ठराव क्र.९ नुसार सदर अनुज्ञप्तीस नाहरकत प्रमाणपत्र व बांधकाम अधिकृत असल्याबाबतचा दाखला देण्यात आला आहे. तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी दि.३०.१०.२०१७ रोजी सदर जागेच्या ताबे पावतीस स्थगिती दिली आहे. यामुळे अनुज्ञप्तीधारकाने मा.दिवाणी न्यायालय, मेहकर येथे दिवाणी दावा दाखल केला आहे. मा.न्यायालयाचे जैसे थे चे आदेश असल्याने याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे पेमेंट थकित असल्याबाबत**

**(४६) ११३१११ (२३-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील १० हमीभाव खरेदी केंद्रावर डिसेंबर अखेरपर्यंत ३३ हजार क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली असून २ हजार क्विंटल सोयाबीनचे पेमेंट अद्याप झालेले नसून ५० लाखांचे पेमेंट थकित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर पेमेंटचे वाटप करण्याबाबत विचारणा केली असता शेतकऱ्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून योग्य ती उत्तरे दिली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना पेमेंट वाटप करण्याबाबत तसेच सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.

लातूर जिल्ह्यातील १० खरेदी केंद्रावर २२११ शेतकऱ्यांची ३४,४२९ क्विंटल सोयाबीन खरेदी केली असून रुपये १०,५०,०८,४५०/- इतकी रक्कम सबएजंट संस्थामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे अन्न देण्यात येत असल्याबाबत**

**(४७) ११४४०९ (१८-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शिळे आणि निकृष्ट दर्जाचे अन्न देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासकीय आदिवासी वसतीगृहाला स्वत:ची इमारत नसल्याने शहरातील एका जीर्ण इमारतीत वसतीगृह सुरू असून त्याची दुरवस्था झाल्याने या विद्यार्थ्यांना तेथे वास्तव्य करणे त्रासदायक झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या आदिवासी वसतीगृहाला शासनाकडून स्वतंत्र इमारत उभारण्यास जागा व निधी देण्याबाबत व निकृष्ट अन्न देणा-या प्रशासनावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) सन २०१७-१८ करिता कर्जत, जि.रायगड येथील वसतीगृहातील मुलांच्या भोजनाकरीता नेमण्यात आलेल्या भोजन पुरवठाधारकाने दि.१३.१०.२०१७ रोजी व त्या सुमारास वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजन कमी देणे, चवहिन भोजन देणे, चायनिज पदार्थ खाऊ घालणे, शिळे जेवण देणे, सब ठेकेदार नेमणे अशा प्रकारच्या तक्रारी प्रकल्प अधिकारी, पेण, जि.रायगड यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

(२), (३) व (४) सदर वसतीगृहासाठी सर्व सुविधायुक्त आर.सी.सी. बांधकामाची १८ रूम असलेली पक्की नवीन इमारत दि.०१.१२.२०१७ पासून भाडेतत्वावर घेण्यात आली आहे. तसेच सदर वसतीगृहाकरीता शासकीय इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्रकल्प अधिकारी, पेण यांनी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे संबंधीत भोजन पुरवठादाराची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली असून त्या पुरवठादारकाचे नाव काळ्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील साखर कारखानदार ऊसाला मान्य केलेला भाव देत नसल्याबाबत**

**(४८) ११५०६२ (१९-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखरेचा भाव कमी असल्याचे दाखवून साखर कारखानदार ऊसाला मान्य केलेला भाव देण्यास दिरंगाई करीत असून काही कारखान्यांची एफआरपी देखील देता येत नसल्याचे भुमिका घेत असल्याचे निदर्शनास आल्यावर मान्य केलेले दर न दिल्यास राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा ऊस उत्पादक संघर्ष समितीने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरेच्या भावावरुन ऊसाचा भाव ठरविण्याऐवजी उसाच्या भावावरुन साखरेचा भाव ठरवावा, उसाला उत्पादन खर्चावर आधारीत किमान समान पहिली उचल देण्याचे धोरण स्विकारण्याचे संदर्भात समिती स्थापना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.सहकार मंत्री यांच्या उपस्थितीत नागपूर येथे संघर्ष समिती सोबत झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी समिती गठीत करण्यात आली आहे काय, असल्यास, सदर समिती केव्हा गठीत करण्यात आली आहे व त्या समितीमध्ये सदस्य म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

याबाबत उच्चस्तरीय समिती गठीत करणेची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) सदर समिती गठीत करण्याचे विचाराधीन असल्याने उर्वरित उपप्रश्नांची उत्तरे निरंक आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील नवीन वस्त्रोदयोग धोरणाबाबत

**(४९) ११५१९२ (२३-०४-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नवीन वस्त्रोद्योग धोरण शासनाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन वस्त्रोद्योग धोरणाची वैशिष्ट्ये काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील चालू असलेल्या सूतगिरण्यांना इतर राज्याच्या तुलनेत विजेच्या दर युनिटमागे २ ते ३ रुपये जास्त दर द्यावा लागत असल्यामुळे राज्यातील चालू असलेल्या सुतगिरण्या अडचणीत आल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सूतगिरण्यांना विजेच्या दरात सवलत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०५-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्याचे नविन वस्रोद्योग धोरण २०१८-२३ दि. १५/०२/२०१८ रोजी जाहीर झाले आहे.

(२) वस्रोद्योगाच्या साखळीमधील सर्व प्रक्रीया उद्योगांवर विशेष भर देऊन, तसेच राज्यात उत्पादित होणाऱ्या कापूस,रेशीम, लोकर, अन्य अपारंपारीक तंतूवर व मानव निर्मित तंतूवर प्रक्रिया होवून रोजगार निर्मिती व्हावी या साठी राज्याचे नविन वस्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये जाहीर केलेल्या “वस्त्रोद्योग धोरण २०१८-२०२३” मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना वीजदरात प्रति यूनिट रु. ३/- इतकी सूट तीन वर्षाकरीता जाहीर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील साखर कारखान्यांना पुरेशा प्रमाणावर ऊस न मिळाल्याने ४० टक्के साखर कारखाने बंद झाल्याबाबत

**(५०) ११५७४२ (१९-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांना पुरेशा प्रमाणावर ऊस न मिळाल्याने ४० टक्के साखर कारखाने बंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे साखरेच्या उत्पादनात घट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.